OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on *"Sustainable Development Goals"*

# गुणवत्तापूर्ण शिक्षण
## (Quality Education)

**प्रा.अशोक रामचंद्र गोरे**
*समाजशास्त्र विभाग*
*व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद*
*Email: ashokgore40@gmail.com*

***गोषवारा (Abstract) :***

भारतात गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा उद्देश साध्य करण्यासाठी अनेक राज्यांनी उपाययोजना केल्या आहेत. यामध्ये पायाभूत सुविधामध्ये सुधारणा, मध्यान्ह भोजन, शिष्यवृत्ती, प्रोत्साहन भत्ता, पोषाख, अनुदान, मोफत पुस्तके, स्पर्धाचे आयोजन, शाळेचे संगणकीकरण इत्यादींचा समावेश होतो. विद्यार्थ्यांचे व्यवस्थित मूल्यमापन, रोजगार आधारीत शिक्षण व्यवस्था, मातृभाषेतून शिक्षण, शिक्षणातून भारतीय मूल्यांची रूजवण, शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग या सर्व माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा उद्देश साध्य होण्यास मदत होईल. शिक्षणाविषयीची उदासिन वृत्ती, बेकारी आणि दारिद्र्य, संघटित प्रयत्नांचा अभाव, विनाअनुदान तत्व आणि शिक्षणाचे व्यापारीकरण ही मोठी आव्हाने गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा उद्देश साध्य करण्यामधील आहे. या आव्हानांचा प्रतिकार करण्याचे प्रयत्न अनेक पातळ्यांवर सुरू आहेत.

**Keywords: शिक्षण**

**प्रास्ताविक :–**

व्यक्तीच्या जन्मजात व निसर्गदत्त शक्तीचा आविष्कार करून तिचा सर्वांगिण विकास करणे म्हणजे शिक्षण प्रत्येक व्यक्तीच्या जन्मापासून शिक्षणाला सुरूवात होते आणि ते आयुष्याच्या अंतापर्यंत चालू राहते. औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण प्रत्येकाच्या आयुष्यात चालूच असते. आणि त्यामुळेच प्रत्येकजण जन्मभर विद्यार्थी असतो असे म्हटले जाते. भारताला औपचारिक शिक्षणाचा आणि शिक्षणाच्या ध्येयाचा मोठा इतिहास आहे. आधुनिक काळात शिक्षणाची ध्येये आधुनिक काळानुरूप बदलत आहेत. महात्मा फुले, राजर्शी शाहू महाराज, आगरकर, डॉ.आंबेडकर, म.गांधी यांना समाज परिवर्तन करायचे होते आणि त्यासाठी त्यांनी शिक्षण ह्या प्रभावी साधनाचा अंगिकार केला. व्यक्तीच्या अनेक मुलभूत गरजांपैकी शिक्षण ही एक अत्यंत प्रभावी गरज आहे. मानवाचे जीवन हे शिक्षणाने समृध्द होत असते. शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षण हे व्यक्तीचे व्यक्तिमत्व घडवण्यात तसेच चारित्र्य घडवण्यात महत्वाची भूमिका बजावत असते.

आधुनिक काळात आणि आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत शिक्षणाचे संदर्भ आणि उददेश बदलत आहेत. सामाजिक न्यायाची प्रस्थापना करण्यासाठी शिक्षण हे महत्वाचे साधन गृहित धरले जात आहे. औपचारिक शिक्षणाचा संख्यात्मक विस्तार करताना गुणात्मक शिक्षण ह्या संकल्पनेवर अधिक भर दिला जात आहे. आधुनिक काळात गुणवत्तापूर्ण शिक्षण आवश्यकच नाही तर अनिवार्य बनत आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणात व्यक्तीचा विकास हाच समाजाचा विकास अपेक्षित असतो. समाजाच्या विकासाने राष्ट्राच्या सर्वांगिण विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण आवश्यक आणि अनिवार्य आहे.

**शिक्षणाचा अर्थ :—**

म.गांधी :— ''माणसाच्या शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक उत्कृष्टतेचा सर्वांगिण विकास म्हणजे शिक्षण होय.''

स्वामी विवेकानंद :— ''आपल्या इच्छाशक्तीचा विकास साधून व तिचे नियंत्रण करून आत्मविकास करण्यासाठी त्या इच्छाशक्तीचा उपयोग करणे म्हणजे शिक्षण होय.''

व्हाईटहेड :— ''ज्ञानाचा उपयोग करून घेण्याचे कौशल्य संपादन करणे म्हणजे शिक्षण.''

रूसो :— ''शिक्षण म्हणजे कृत्रिमता नसून नैसर्गिक प्रवृत्तींचा विकास.''

**गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अर्थ :—**

''गुणवत्तापूर्ण शिक्षण म्हणजे असे शिक्षण की जे प्रत्येक मुलाला त्याच्या उपयोगी पडले, तसेच प्रत्येक मुलाच्या क्षमतांचा त्यांच्या सर्वांगिण विकासास मदत करणारे असेल.''

''व्यक्तीमधील उत्कृष्टतेचा विकास आणि आविष्कार करणारे शिक्षण म्हणजे गुणवत्तापूर्ण शिक्षण होय.''

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :—**

१. गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संकल्पना लक्षात घेणे.
२. गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे घटक अभ्यासणे.
३. आधुनिक काळात गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आवश्यकता तपासणे.
४. भारतातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे स्वरूप लक्षात घेणे.

**शोधनिबंधाची गृहितके :—**

१. आधुनिक गुणवत्तापूर्ण शिक्षण आवश्यक आहे.
२. भारतात गुणवत्तापूर्ण शिक्षण आवश्यक आहे.
३. भारतात गुणवत्तपूर्ण शिक्षणाच्या त्रुटीमुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत.
४. सामाजिक न्याय ही संकल्पना साध्य करण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाला चालना देणे आवश्यक आहे.

**संशोधन पध्दती/तंत्र :—**

प्रस्तुत शोधनिंबध द्वितियक साधन सामग्रीवर आधारीत आहे. त्यासाठी संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, विकिपिडीया या साधनांचा आधार घेण्यात आला आहे.

**विषय विश्लेषण :—**

२०११ च्या जनगणनेनुसार भारतात साक्षरतेचे प्रमाण ७४.४७ टक्के एवढे आहे. भारतात उच्चशिक्षण देणारे केंद्रिय विद्यापीठांची संख्या २०, राज्य विद्यापीठे २१५, समकक्ष विद्यापीठे १०० तर देशात १४.५ लाख प्राथमिक शाळा आहेत. जगातील काही विकसित राष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण असे आहे. अमेरिका ९९ टक्के, ब्रिटन ९९ टक्के, आस्ट्रेलिया ९८ टक्के, ब्राझील ९६ टक्के, चीन ९५टक्के, जर्मनी ९९ टक्के या राष्ट्रांशी तुलना करता भारतात अद्यापही साक्षता प्रमाण कमी असल्याचे दिसते. भारतात प्रचलित शिक्षण पध्दतीच्या अनेक समस्या आहेत. UNICEF च्या मते भारतातील ५९ टक्के विद्यार्थी व्यवस्थित शिक्षण घेत नाहीत. विद्यार्थी—शिक्षक गुणोत्तर देखील विचार करायला भाग पाडणारे आहे. प्राचीन काळात नालंदा विद्यापीठात १०००० विद्यार्थी आणि त्यांना

शिकविणारे २००० शिक्षक असल्याचा उल्लेख सापडतो. आजघडीला भारतातील निरक्षर लोकांची संख्या जगात प्रथम कमांकावर आहे. शिक्षणाच्या अशा अवस्थेत गुणवत्तापूर्ण शिक्षणाकडे वाटचाल करणे आव्हानात्मक आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षणात शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक मुला—मुलींचा विचार अभिप्रेत असतो त्यांच्या क्षमता ओळखून त्या क्षमतांचा विकास करणे आवश्यक असतो. त्यांच्या क्षमता ओळखून त्या क्षमतांचा विकास करणे आवश्यक असते. एकुणच शिक्षणप्रक्रियेत गुणवत्ता अपेक्षित असते. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचे निकष, अभ्यासकम, अध्यापन, प्रकल्प, प्रयोग आणि मूल्यमापन याबाबत गुणवत्ता अपेक्षित असते. विद्यार्थ्यांचे वैयक्तिक वेगळेपण, विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम या माध्यमाने शिक्षणाची संधी उपलब्ध झाली पाहिजे. साधन, वस्तू आणि संकल्पनांचा अर्थ स्पष्ट करणारे शिक्षण देणे अपेक्षित आहे. समस्यांचे समाधान करण्याची क्षमता विकसित करणारे शिक्षण हवे. गुणवत्तापूर्ण शिक्षणात जीवन कौशल्याचा विकास अपेक्षित आहे.

गुणवत्ता म्हणजे विशिष्ठ गुणांची उत्कृष्ठता होय. शिक्षणामध्ये याच अनुषंगाने गुणवत्ता आवश्यक आहे. भारताच्या शिक्षण प्रक्रियेत शैक्षणिक गुणवत्ता आणि शैक्षणिक समानता गरजेची आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण हे संशोधन आणि चिकित्सेला चालना देणारे असते अशा शिक्षणात अध्यापकांच्या क्षमतांचा विकास करणारे विविध उपक्रम आयोजित करावे लागतात.

भारतात गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा उद्‌देश साध्य करण्यासाठी अनेक राज्यांनी उपाययोजना केल्या आहेत. यामध्ये पायाभूत सुविधामध्ये सुधारणा, मध्यान्ह भोजन, शिष्यवृत्ती, प्रोत्साहन भत्ता, पोषाख, अनुदान, मोफत पुस्तके, स्पर्धाचे आयोजन, शाळेचे संगणकीकरण इत्यादींचा समावेश होतो. विद्यार्थ्यांचे व्यवस्थित मूल्यमापन, रोजगार आधारीत शिक्षण व्यवस्था, मातृभाषेतून शिक्षण, शिक्षणातून भारतीय मूल्यांची रूजवण, शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग या सर्व माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा उद्‌देश साध्य होण्यास मदत होईल. शिक्षणाविषयीची उदासिन वृत्ती, बेकारी आणि दारिद्र्य, संघटित प्रयत्नांचा अभाव, विनाअनुदान तत्व आणि शिक्षणाचे व्यापारीकरण ही मोठी आव्हाने गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा उद्‌देश साध्य करण्यामधील आहे. या आव्हानांचा प्रतिकार करण्याचे प्रयत्न अनेक पातळ्यांवर सुरू आहेत.

**निष्कर्ष :—**

१. गुणवत्तापूर्ण शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.
२. भारतात गुणवत्तापूर्ण शिक्षणाची मंद गतीने वाटचाल होत आहे.
३. शिक्षणाचे व्यापारीकरण हा गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सर्वांगिण विकासातील अडसर आहे.
४. भारतात गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या विकासाला मोठा वाव आहे.

**संदर्भ :—**

[1] दोशी, एस.एल., जैन, पी.सी. 'भारतीय समाज' (संरचना और परिवर्तन) — नॅशनल पब्लिशिंग हाउस जयपूर, दिल्ली, प्रकाशन वर्ष — २०१४
[2] करंडे सतीशकुमार, 'ग्रामीण विद्यार्थ्यांच्या समस्या आणि उपाय' — सुगावा प्रकाशन, पुणे, ऑगस्ट २००५
[3] ठाकूर सुरेंद्र, कनकदंडे श्वेतांबरी, 'सामाजिक संस्था' — विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती २०१९
[4] विकिपिडिया